▶ वर्ष–३

■ अंक–२७

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ५ फेब्रुवारी २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com




दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४ | पान : २
www.diwanews.com

## मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावाची खात्री करावी –जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे** : मा. भारत निवडणूक आयोगाकडील दि.२९ मे २०२३ रोजीच्या निर्देशानुसार ०१ जानेवारी, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत दि. २३ जानेवारी, २०२४ रोजी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदारयादी अंतिमरित्या प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. या मतदारयाद्या मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या वेबसाईटवर तसेच सर्व विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात तपासणी करण्यासाठी उपलब्ध आहेत.

# ठाण्यातील जलतरणपटू मानव मोरे, आयुष तावडे यांनी केला सलग २४ तास पोहण्याचा विक्रम





**ठाणे** : सलग २४ तास ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरण तलावात पोहण्याचा विक्रम ठाण्यातील दोन जलतरणपटूंनी केला आहे. मानव मोरे व आयुष तावडे हे राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू असून त्यांनी केलेल्या या विक्रमाचे ठाणेकरांकडून कौतुक होत आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अनोख्या पध्दतीने जलतरणपटू मानव मोरे व आयुष तावडे यांनी मानवंदना दिली आहे. २६ जानेवारी रोजी दुपारी १२.२५ मिनिटांनी या दोन्ही जलतरणपटूंना माजी आमदार रविंद्र फाटक व आमदार निरंजन डावखरे यांनी झेंडा दाखविल्यानंतर या जलतरपटूंनी तरणतलावात उडी मारली. या दोन्ही जलतरणपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी ठाण्यातील मान्यवर उपस्थित होते.

सलग २४ तास पोहल्यानंतर २७ जानेवारी रोजी दुपारी १२.२५ मिनिटांनी त्यांचे पोहणे थांबले तेव्हा त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात आला. तरणतलावात सलग २४ तास पोहण्याचा विक्रम होण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच वेळ आहे. मानव मोरे हा १८ वर्षाचा तर आयुष तावडे हा १४ वर्षाचा जलतरणपटू आहे, सलग २४ तास पोहून त्यांनी प्रजासत्ताक दिनी भारतीय ध्वजाला सलामी तर दिलीच परंतु धर्मवीर आनंद दिघे यांना देखील जयंतीदिनी मानवंदना दिली. या दोन्ही जलतरणपटूंचे कौतुक करण्यासाठी आमदार प्रताप सरनाईक, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, सुधीर बर्गे, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, सहाय्यक आयुक्त महेश आहेर, तरणतलाव उपव्यवस्थापक रवी काळे, महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेचे सचिव राजेंद्र पालकर, निरीक्षक अजय फाटक, शैलेश सिंग, ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे सचिव अतुल पुरंदरे, स्टारफिश स्पोर्टस फाऊंडेशनचे उपाध्यक्ष अनिल दगडे, मनोज कांबळे आंतरराष्ट्रीय जलतरणपटू मयंक चाफेकर आदी उपस्थित होते.

# जिल्हा न्यायालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

**ठाणे** : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे श्री. श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे आणि ठाणे जिल्हा वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत राजभाषा मराठीचे संवर्धन, प्रसार व जास्तीत जास्त न्यायालयीन कामामध्ये मराठी भाषेचा वापर या विषयावर दि. ३० जोनवारी २०२४ रोजी ठाणे जिल्हा वकील संघटना, ठाणे यांचे विधीज्ञ कक्ष येथे कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सचिव ईश्वर कां. सूर्यवंशी, प्रमुख मार्गदर्शक वक्ते जेष्ठ विधीज्ञ ॲड. गजानन बी. चव्हाण, माजी अध्यक्ष व सदस्य बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा, ॲड. प्रशांत कदम, ठाणे जिल्हा वकील संघटना व पदाधिकारी अध्यक्ष आणि वकील उपस्थित होते.

या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून ॲड. श्री. गजानन बी. चव्हाण, जेष्ठ विधीज्ञ तथा माजी अध्यक्ष, बार काऊंसील ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांनी उपस्थितांना न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे, इंग्रजी भाषेऐवजी मराठी भाषेत काम करत असतांना येणाऱ्या अडचणी, तसेच नित्य व्यवहारात चालणारे इंग्रजी शब्दाऐवजी मराठी भाषेचा वापर करण्याचे आवाहन करुन उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच न्यायालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर होण्यासाठी ठाणे जिल्हा न्यायालयातून चळवळ सुरु झाली होती याचीही आठवण करुन दिली.

त्यानंतर ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव ईश्वर कां. सूर्यवंशी यांनी उपस्थितांना मराठी भाषेचा वापर न्यायालयीन कामकाजात जास्तीत जास्त प्रमाणात करावा, असे आवाहन केले.

# मुंबई– गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करावे – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



**मुंबई** : कोकणासाठी अत्यंत महत्वाचा असलेला मुंबई– गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे दिल्या.

मंत्री गडकरी यांनी मुंबई– गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय जयस्वाल, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाळ रेड्डी, रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे, राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता संतोष शेलार यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले की, मुंबई– गोवा महामार्गाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे. त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही महसूल विभागाने तातडीने पूर्ण करावी. भूसंपादनाचे प्रस्ताव आगामी १५ दिवसांत निकाली काढावेत. महामार्गाच्या कामाचा नियमितपणे आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री चव्हाण यांनी सांगितले की, मुंबई– गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. श्री. जयस्वाल यांनी महामार्गाच्या कामाच्या सद्य:स्थितीची माहिती दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# नवी मुंबईकर नागरिकांचा 'शासन आपल्या दारी' उपक्रमास उत्साही प्रतिसाद



**नवी मुंबई :** 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून ६ हजाराहून अधिक नागरिकांनी उपक्रमस्थळी भेट देत सरकारच्या व महानगरपालिकेच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती घेतली आहे व लाभ घेतला आहे.

महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० जानेवारीपासून दिघा येथून शासन आपल्या दारी अभियानास प्रारंभ झाला असून प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहत हा उपक्रम यशस्वी केला आहे.

आजही स्वामी विवेकानंद सांस्कृतिक भवन, सेक्टर-१४,१५ वाशी येथे सकाळच्या सत्रात १५० हून अधिक नागरिकांनी सहभागी होत उपक्रमाचा लाभ घेतला. समाजविकास विभागाचे उपआयुक्त तथा शासन आपल्या दारी उपक्रमाचे नमुंमपा स्तरीय नोडल अधिकारी श्री. किसनराव पलांडे यांनी नागरिकांचे आभार मानत जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत हा संदेश पोहचवून या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे नेटके आयोजन वाशी विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. सागर मोरे आणि सहकारी अधिकारी, कर्मचारी यांनी केले होते. यावेळी वैदयकीय अधिकारी डॉ. कविता बोराडे, समाजविकास अधिकारी श्री. सर्जेराव परांडे यांनी उपस्थित राहून नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहीत केले.

२० जानेवारीपासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरु झालेला शासन आपल्या दारी हा उपक्रम ६ फेब्रुवारीपर्यंत २८ ठिकाणी आयोजित करण्यात आला असून यापूर्वीच्या सर्वच ठिकाणी नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिलेला आहे.

यामध्ये २९ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात कोपरखैरणे येथे सीबीएसई माध्यमाची नमुंमपा शाळा क्र. ९४ सेक्टर ११, बोनकोडे या ठिकाणी ५१० नागरिकांनी तसेच नमुंमपा शाळा क्र.३६ व ३७ कोपरखैरणे गाव येथे ४५० हून अधिक नागरिकांनी उपस्थिती दर्शवत योजनांचा लाभ घेतला.

३० जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात नमुंमपा शाळा क्र.३३ पावणे गाव येथे २०२ व दुपारच्या सत्रात नमुंमपा शाळा क्र.४० महापे गाव या ठिकाणी २९५ नागरिकांनी उपक्रमास्थळी उपस्थिती दर्शविली.

३१ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात तुर्भे विभाग कार्यालयातील सानपाडा येथील सभागृहात १७२ जणांनी तसेच दुपारच्या सत्रात आयसीएल शाळा से.२१ तुर्भे येथे ४३३ जणांनी लाभ घेतला.

१ फेब्रुवारी रोजी बगाडे कंपनीसमोरील मोकळी जागा इंदिरानगर तुर्भे येथे ४३६ नागरिक सकाळच्या सत्रात तसेच कोपरीगाव मैदान तुर्भे येथे दुपारच्या सत्रात ४२३ नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे.

महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आलेला शासन आपल्या दारी हा उपक्रम सर्वच ठिकाणच्या नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत यशस्वी केला असून उपक्रमांच्या आयोजनामध्ये सर्वच विभागांना समान संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्देशानुसार नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या त्रास न होता सरकारी योजनांचा लाभ थेट त्यांच्या घराजवळ मिळावा यादृष्टीने शासन आपल्या दारी हा अभिनव उपक्रम संपूर्ण राज्यात राबविला जात आहे. शासकिय योजना लोकाभिमुख व्हाव्यात व त्याची कालमर्यादीत गतीमान अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास नागरिकांच्या मोठया संख्येने मिळणारा सहभागाचा प्रतिसाद हा या उपक्रमाची यशस्विता वाढविणारा आहे.

६ फेब्रुवारी रोजी या उपक्रमाची सांगता होणार असून बेलापूर विभाग कार्यक्षेत्रात सकाळी ११ ते १ यावेळेत वारकरी भवन, सेक्टर ३ ए, सीबीडी बेलापूर येथे तसेच दुपारी २ ते ५ या वेळेत नमुंमपा शाळा क्र.१ बेलापूर गाव उपक्रम आयोजन करण्यात आले आहे. त्यापूर्वी उदया ३ फेब्रुवारी रोजी महात्मा जोतिबा फुले सांस्कृतिक भवन, सेक्टर ३ वाशी येथे सकाळच्या सत्रात व ईटीसी शिक्षण प्रशिक्षण केंद्र से.३० ए वाशी येथे दुपारच्या सत्रात उपक्रम आयोजन होणार आहे.

४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १ या सत्रात नमुंमपा शाळा क्रमांक १६ शिवाजीनगर नेरुळ येथे तसेच दुपारच्या सत्रात दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत नमुंमपा शाळा क्रमांक १७ , जुईनगर येथे हा उपक्रम आयोजित केला जात आहे. ५ फेब्रुवारी रोजी नमुंमपा शाळा क्रमांक ११, से-१४ कुकशेत या ठिकाणी सकाळच्या सत्रात तसेच नमुंमपा शाळा क्र.१० नेरुळ गाव येथे दुपारच्या सत्रात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने योजना कल्याणकारी, सर्वसामान्यांच्या दारी हे उद्दिष्ट घेऊन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्र फडणवीस व ना.श्री. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभरात सुरू असलेल्या शासन आपल्या दारी उपक्रमाला नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांचा उत्साही प्रतिसाद लाभत असल्याबद्दल आभार व्यक्त करीत नार्वेकर यांनी जास्तीत जास्त लाभार्थी नागरिकांनी याचा उपयोग करुन घ्यावा असे आवाहन केले आहे.

# पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज प्रकरणांना तातडीने मंजूरी द्या अन्यथा कडक कारवाईला सामोरे जा -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे :** बँकांनी गरजू आणि पात्र लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे प्रलंबित न ठेवता त्या प्रकरणांना तातडीने मंजूरी देण्याची भूमिका स्विकारावी. यापुढे ज्या बँका जिल्हा प्रशासन आणि पात्र लाभार्थ्यांना सकारात्मक प्रतिसाद देणार नाहीत, त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, अशा कडक शब्दात जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे यांनी बँक अधिकाऱ्यांना तंबी दिली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये डी. एल. सी. सी. व डी. एल. आर. सी. ची बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.



या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री.नागेंद्र मंचाल, रिझर्व बँकेचे अधिकारीअरुण बाबू , नाबार्डचे सहाय्यक महाप्रबंधक सुशांत कुमार, उद्योग विभाग कोकण विभागाच्या सहसंचालक श्रीमती विजू शिरसाठ, तसेच सर्व राष्ट्रीयकृत बँकेचे मुख्याधिकारी शिवाय काही खाजगी बँकांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी खरीप पीक कर्जाचे वाटप व रब्बी पीक कर्जाचे वाटप एकूण पीक कर्जामध्ये दिलेल्या उद्दिष्टापैकी ७६ टक्के उद्दिष्ट ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत बँकांनी पूर्ण केलेले आहे, उरलेले उद्दिष्ट २८ फेब्रुवारी २०२४ पूर्वी पूर्ण करावे, सर्व बँकांनी प्राथमिकता क्षेत्रातील कर्ज वाटप वाढवावे, पीएम स्वनिधी चे ठाणे जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेंतर्गत बँकांनी उद्दिष्ट पूर्तीसाठी विशेष प्रयत्न करावेत व जास्तीत जास्त अर्जदारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हातभार लावावा, दिलेले उद्दिष्ट फेब्रुवारी २०२४ या महिनाअखेर पूर्ण करावे, जन मन योजनेंतर्गत कातकरी समाजाच्या जास्तीत जास्त लोकांची जनधन खाती उघडावीत, शिवाय पात्र कातकरी बांधवांना केसीसी कर्ज द्यावे, जिल्हा प्रशासनाने बँकांकडे मागितलेली माहिती वेळच्या वेळी द्यावी, असे स्पष्ट निर्देश उपस्थित बँक अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी नाबार्डचे अधिकारी श्री.सुशांत कुमार यांनी पोटेन्शिअल लिंक क्रेडिट प्लॅन २०२४-२५ पुस्तकाचे जिल्हाधिकारी महोदयांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सोशल नेटवर्क वर कर्जमाफीसंदर्भात खोटे संदेश पाठविले जात आहेत, त्या संदर्भात सर्वांनी सावधानता बाळगावी व अशा अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असेही आवाहन करण्यात आले.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी महोदयांनी दिलेल्या निर्देशांचे सर्व बँका काटेकोर पालन करतील, असे आश्वासित करुन उपस्थित सर्वांचे जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री.नागेंद्र मंचाल यांनी आभार मानले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४
पान : ४
www.diwanews.com

## शासन आपल्या दारी व नमो कामगार कल्याण अभियानांतर्गत बांधकाम कामगारांना मिळाला लाभ

**ठाणे :** महाराष्ट्र शासनाने १५ एप्रिल २३ पासून सुरु केलेल्या ''शासन आपल्या दारी'' या अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात माहे जानेवारी २०२४ अखेर पात्र बांधकाम कामगारांना बांधकाम मंडळामार्फत ७ हजार ३९५ अत्यावश्यक संच व ७ हजार ३९५ सुरक्षा संच वाटप करण्यात आले असून ५ हजार ६४३ कामगारांची विनामूल्य आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच १ हजार ३१० पात्र लाभार्थी बांधकाम कामगारांना द्वारे त्यांच्या बँक खात्यात विविध योजनेतंर्गत रु.१ कोटी ९८ लाख १३ हजार ३४२ इतक्या रक्कमेचा लाभ मंडळाने अदा केला.

१७ ऑक्टोबर २०२३ ते दि.१७ डिसेंबर २०२३ या कालावधीत आयोजित केलेल्या ''नमो कामगार कल्याण'' या अभियानांतर्गत बांधकाम कामगार मंडळामार्फत पात्र १ हजार ५८९ कामगारांना अत्यावश्यक संच व १ हजार ५८९ कामगारांना सुरक्षा संच वाटप करण्यात आलेले आहे, असे ठाणे कामगार उपायुक्त प्र.ना.पवार यांनी कळविले आहे.

कामगार विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यरत असून या मंडळात बांधकाम व बांधकामाशी निगडीत व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी केली जाते. नोंदणी करण्याकरिता मंडळाने संकेतस्थळ (वेबसाईट ..) विकसित केले असून या संकेतस्थळाद्वारे कामगार आपली नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करु शकतात. मंडळामध्ये बांधकाम कामगारास नोंदणी करण्याकरिता बांधकाम व बांधकामाशी निगडीत व्यवसायामध्ये ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र, आधारकार्ड व नोंदणी शुल्क रु. १/- (प्रतिवर्षी) ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावर जमा करुन १८ ते ६० वयोगटातील बांधकाम कामगार आपली नोंदणी करु शकतात. मंडळामध्ये नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारास पात्रतेनुसार मंडळाच्या २६ विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येतो. यामध्ये मंडळाकडून लाभार्थी बांधकाम कामगारांना शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक, आर्थिक सहाय्य व वस्तू स्वरुपात/सुरक्षाविषयक साधने/दैनंदिन साधने इ. योजनांचा लाभ दिला जातो. तरी जास्तीत जास्त बांधकाम कामगारांनी आपली नोंदणी बांधकाम कामगार मंडळाकडे करावी व विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ठाणे कामगार उपायुक्त प्र.ना.पवार यांनी केले आहे.




## उल्हासनगर मधील नवजात स्त्री अर्भकाचे जीव वाचविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार

**ठाणे :** महिला व बालकल्याण विभाग ठाणे, बालकल्याण समिती ठाणे व सेवा संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने नवजात स्त्री अर्भकाचे प्राण वाचविणाऱ्या पाच सामाजिक कार्यकर्त्यांचा दि. १९ जानेवारी २०२४ रोजी बालकल्याण समितीच्या प्रांगणात सत्कार करण्यात आला .

उल्हासनगर येथील कँप – ४ सुभाष टेकडी येथे आम्रपाली नगर मधील सार्वजनिक शौचालयात दि. ११ जानेवारी २०२४ रोजी सकाळी एका महिलेला एक नवजात बाळ आढळून आले, तेव्हा तेथे गर्दी जमली पण कुणीही त्या बालकाचे प्राण वाचवावे किंवा पोलिसांना बोलून संबंधित कारवाई करावी असे न करता केवळ बघ्याची भूमिका घेतली होती. तेव्हा त्या परिसरातील प्रविण सूर्यवंशी, आकाश आहिरे, रूपाली ताटे व संदीप डोंगरे यांनी त्वरित त्या अर्भकाला रुग्णालयात नेले.योग्य वेळी उपचार मिळाल्यामुळे त्या नवजात अर्भकाचे प्राण वाचले. अशा प्रकारे सामाजिक दायित्व सिद्ध करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार बालकल्याण समितीचे अध्यक्ष सौ. राणी बैसाणे व सदस्य सौ. मनिषा झेंडे आणि अर्चना कारोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

या सत्काराला संबोधित करताना बालकल्याण समितीचे अध्यक्ष. सौ. राणी बैसाणे यांनी बालकांसंबंधीत घडणाऱ्या अशा घटना पुन्हा घडू नये, यासाठी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन जनजागृती करावी व अशा घटना घडल्यास नागरिकांनी बघ्याची भूमिका न घेता आपले सामाजिक दायित्व दाखवावे, असे आवाहन यावेळी केले. तसेच संबंधित सत्कार समारंभ करण्यासाठी सेवा संस्थेने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक देखील केले. बाल कल्याण समितीच्या आदेशाने, या बालकास काळजी व स्वरक्षणासाठी नेरूळ येथील संस्थेत दाखल करण्यात आले आहे.

सेवा संस्थेच्या वतीने जिल्हास्तरीय विविध सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधीसाठी जे. जे ॲक्ट, पॉस्को ॲक्ट, बालकामगार कायदा आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा याविषयी ॲड. सीमा अधाते यांची मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत हा सत्कार समारंभ पार पडला.

या वेळी सेवा संस्थेचे संस्थापक ॲड. अशोक पवार, प्रकल्प व्यवस्थापक श्री.रामेश्वर भाले, प्रकल्प समन्वयक श्री. वैभव गायकवाड व ॲड. संजीवनी जाधव , यशोधरा साळवे, निकिता ताम्हणकर, सेवा संस्थेचे सर्व सामाजिक कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित होते.

## अनुसूचित जमातींचे न्याय्य हक्क व अधिकार मिळविण्यासाठी आदिवासी कोळी जमातींच्या बांधवांचे राज्यव्यापी महाआंदोलन

**ठाणे:** शासनाकडून महादेव कोळी, सोन कोळी, डोंगर कोळी, कोळी मल्हार, कोळी ढोर, टोकरे कोळी या आदिवासी जमातींना अनुसूचित जमातीत वर्गीकृत केलेले असताना महाराष्ट्रा शासनातर्फे अनुसूचित जमातीचे कोणतेही लाभ मिळत नसल्यामुळे शासनाच्या या कृतीचा निषेध करण्यासाठी तसेच शासनाने अनुसूचित जमातींना जाचक ठरतील असे प्रारित केलेले शासन निर्णय कै. दाजीबा पाटील समितीच्या शिफारशीनुसार रद्दबातल करण्यासाठी तसेच आपले न्याय्य हक्क व अधिकार मिळविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग, उपोषण व धरणे स्वरूपात राज्यव्यापी महाआंदोलने करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालया समोर आदिवासी कोळी जमातीतील बांधवांनी आपले न्याय्य हक्क व अधिकार मिळविण्यासाठी धरणे आंदोलन सुरू केलेले आहे. या आंदोलनात आदिवासी कोळी जमातीतील बहुसंख्य बांधव सहभागी होत आहेत व आपला जाहीर पाठींबा देत आहेत. आंदोलनात रवींद्र कोळी, नितीन मोकाशी, गणेश भोईर, दीपाली कोळी, अंकुश मढवी, गिरीश साळगांवकर, जगदीश पाटील, आनंद कोळी, भूपेंद्र गवते इत्यादी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४
पान : ५
www.diwanews.com



# सार्वजनिक स्वच्छतेमध्ये बाधा आणणाऱ्या नागरिकांवर निर्बंध आणण्यासाठी दंडात्मक कारवाई करावी

## सफाई कर्मचाऱ्यांनी केली आयुक्त बांगर यांच्याकडे मागणी

ठाणे (०२) : ठाणे शहर दिवसागणिक स्वच्छतेची मानके पुर्ण करते आहे. यासाठी अनेक उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत आहे पण अजूनही काही नागरिक बेशिस्त वागतात, अनेकदा महापालिका कर्मचारी सकाळी कचरा नेण्यासाठी घरी जातात तेव्हा दार उघडत नाहीत व त्यानंतर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जातो, अशा नागरिकांना शिस्त लावण्यासाठी महापालिकेने कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी ठाणे महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी आयुक्त अभिजीत बांगर यांच्याकडे केली आहे. आपले ठाणे शहर सर्वांगाने बदलत असून स्वच्छतेत देखील आपले शहर सर्वोच्च स्थानी राहिल यासाठी आम्ही निश्चितच प्रयत्न करीत आहोत असा विश्वासही सफाई कर्मचाऱ्यांनी आयुक्तांना दिला.

सफाई कर्मचारी आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी जबाबदार आहेत, मात्र त्याच वेळी ठाणे शहराचे नागरिक म्हणून शहराप्रती त्यांच्या काही अपेक्षा असू शकतात व त्यांची काही मते देखील असू शकतात हे सर्व जाणून घेण्यासाठी आयुक्त अभिजीत बांगर यांनी सुरू केलेल्या माझ्या नजरेतून बदलते ठाणे या उपक्रमाचे पाचवे सत्र गुरूवारी (०१ फेब्रुवारी) ठाणे महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसमवेत पार पडले. यात शहराच्या विविध भागात काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

या पाचव्या चर्चासत्रात वैशाली जाधव, कांताबाई सोनकांबळे, शिवानी बिडवई, अश्विनी पवार, सीता राठोड, सारिका मेस्त्री, संगिता अडसुळे, कांचन चिखले, जितेश प्रकाश पोतदार, सत्यविजय कांबळी, दत्तात्रय वनमाळी, संजय बोंढारे, जितेश वागले, मनोज दाभोळकर, सागर पाटील आदी सफाई कर्मचारी उपस्थित होते.

ठाणे शहर बदलते आहे, शहरातील सर्वच भागात सफाई कर्मचारी स्वच्छता करीत असतात, परंतु काही नागरिक हे सफाई झाल्यावर पुन्हा रस्ते, गटार, नाले व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकतात यावर महापालिकेने दंड आकारुन त्यांना रितसर पावती दिल्यास नागरिक रस्त्यावर कचरा टाकणे निश्चितच बंद करतील. तसेच प्रत्येक ठिकाणी दंडात्मक कारवाईचे फलक लावावेत अशी सूचना महिला सफाई कर्मचारी संगिता अडसुळे यांनी केली. तसेच शहरात विविध ठिकाणी उभ्या राहणाऱ्या घंटागाड्यांना वेळ वाढवून द्यावा, त्याचप्रमाणे शहरातील विविध ठिकाणी रस्त्यावर कचरा टाकण्यासाठी स्टीलच्या दोन टाक्या लावण्यात आल्या आहेत तेथे मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्यामुळे त्या तुडुंब भरतात व परिसरात दुर्गंधी पसरते, त्यामुळे सदरच्या टाक्यांमध्ये हलक्या स्वरुपातील कचऱ्याव्यतिरिक्त अन्य कचरा टाकला जाणार नाही यापासून नागरिकांना परावृत्त करण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही यावेळी मांडण्यात आल्या.

### सर्व्हिसरोडवरील गाड्या हटवाव्यात

शहरातील सर्व्हिस रोडवर अनेक ठिकाणी जुन्या गाड्या या कायमस्वरुपी उभ्या असतात, त्यामुळे या वाहनांखालचा कचरा काढणे शक्य होत नाही. तसेच गाड्या पार्किंग देखील केलेल्या असतात. सकाळी सफाई होत असल्यामुळे पार्किंग केलेल्या गाड्या उशिरा निघाल्यानंतर त्या गाड्याखालचा कचरा दिसून येतो. यासाठी पार्किंग एक दिवसाआड दोन्ही बाजूस ( ) करण्यात यावी अशीही मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या उभ्या असलेल्या वाहनांखाली काही वेळेस मुके प्राणी मरुन पडलेले असतात, वाहनांखालील प्राणी तातडीने हलविणे शक्य नसल्याने सदर परिसरात दुर्गंधी पसरते. काही वेळेस सडलेल्या अवस्थेतील प्राणी सफाई कर्मचाऱ्यांनाच काढावे लागत असल्याने ही बाब आरोग्याच्या दृष्टीनेही घातक आहे, तरी रस्त्याच्या दुतर्फा पार्किंग केलेल्या वाहनांबाबत योग्य तो निर्णय व्हावा व याबाबत जनजागृती करावी हा मुद्दा सफाई कर्मचाऱ्यांनी पोटतिडकीने मांडला.

### शौचालयात पाण्याची उपलब्धतता असावी.

शहरातील सार्वजनिक शौचालयाची स्वच्छतांची दुरावस्था ही गर्दुल्यांमुळे होत आहे, मद्यपी मद्यप्राशन करुन बाटल्या शौचालयात टाकतात, अनेकदा साफसफाई करताना बाटल्यांच्या काचा सफाई कर्मचाऱ्यांना लागतात, यावर कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच शौचालयाजवळ पाण्याच्या टाक्या तसेच नळाला पाणी असणे आवश्यक आहे. तरच सार्वजनिक शौचालये स्वच्छ राहतील. अनेक गर्दुल्ले, मद्यपी व अन्य समाजकटंकाच्या माध्यमातून सार्वजनिक शौचालयात होणारा उपद्रव कमी करणे, तसेच शौचालयांची नियमित स्वच्छता राहिल हे सुनिश्चित करणे अशा अपेक्षा यावेळी सफाई कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या.

### रस्ते चांगले हवेत

शहरात अनेक ठिकाणी विविध कामांसाठी केबल्स टाकण्यासाठी रस्ते खणले जातात, परंतु ते पुन्हा पूर्ववत केले जात नाही, त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यातून सफाई करताना त्रास होत असल्याचेही सफाई कर्मचाऱ्यांनी नमूद केले. कॉंक्रिट तसेच डांबरीकरण असलेल्या रस्त्यावरील कचरा हा व्यवस्थित निघत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच सफाईसाठी लागणारी उपकरणे हे देखील वेळोवेळी व अधिक संख्येने उपलब्ध करुन द्यावीत. उदा. एक झाडू एक आठवड्यापेक्षा जास्त टिकत नाही, त्यामुळे महिन्यातून किमान तीन किंवा चार झाडू उपलब्ध करुन द्यावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सफाई कामगार म्हणून काम करताना वारस योजनेच्या माध्यमातून आपल्यापैकी पात्र कर्मचाऱ्यांची पाल्ये भविष्यामध्ये सफाई कामगार म्हणून काम करण्यासाठी पात्र ठरणार असली तरी मुलांच्या उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे व उच्च शिक्षणाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा व या माध्यमातून वरिष्ठ स्तरावरील शासकीय व खाजगी नोकरी किंवा स्वयंउद्योग याकडेही भर देणे गरजेचे असल्याचे आयुक्त श्री. बांगर यांनी नमूद केले.

### सफाई कर्मचाऱ्यांसाठी सेवासुविधा

सफाई कर्मचाऱ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी केली जात असली तरी त्यामध्ये सुधारणा व्हावी असे मत काही जणांनी व्यक्त केले. ही वार्षिक तपासणी वर्षातून दोन वेळा व्हावी, त्याचे रिपोर्टस मिळावेत तसेच जर कोणाला काही व्याधी असल्यास पुढचे उपचारही मिळावेत अशी अपेक्षाही सफाई कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

आपल्या शहराबद्दल सफाई कर्मचारी म्हणून नव्हेतर नागरिक म्हणून तुम्हाला काय वाटते? काय बदल आवश्यक आहेत? कौटुंबिक परिस्थिती कशी आहे, मुले काय शिकतात किंबहुना मुलांना पुढे काय व्हावेसे वाटते याबद्दल आयुक्तांनी कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. तेव्हा उपस्थित असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी आज आपण आम्हाला आपल्यासमवेत चर्चेला बोलविले व आमच्या समस्या ऐकून घेतल्या त्याबद्दल उपस्थित सर्वांनी आयुक्तांचे आभार व्यक्त केले, यावेळी सर्व कर्मचाऱ्यांच्या आनंद दिसून येत होता.

या चर्चासत्रात सफाई कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या सूचना या शहराच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. आगामी काळात याबाबत सकारात्मक विचार करुन दैनंदिन स्वच्छता अधिक प्रभावी होईल यासाठी आपणा सर्वांना बरोबर घेवून काम केले जाईल असेही आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी यावेळी नमूद केले.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी महापालिकेतर्फे स्कॉलरशीप

**मुलांच्या शिक्षणासंदर्भात आयुक्तांनी प्रश्न विचारला असता, मुलांच्या शिक्षणाची फी परवडत नाही त्यामुळे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असली तर आर्थिकदृष्ट्या शक्य होत नसल्याचे त्यांनी नमूद केले. यावर महापालिका तसेच कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी महापालिकेने स्कॉलरशीप योजना सुरू केलेली आहे. सदर स्कॉलरशीप अंतर्गत इयत्ता पहिली ते चौथी पर्यत प्राथमिक शिक्षणासाठी वार्षिक रुपये ४ हजार, पाचवी ते सातवी पर्यंतच्या माध्यमिक शिक्षणासाठी वार्षिक रु. ६ हजार, आठवी ते दहावीपर्यंतच्या उच्च माध्यमिक शिक्षणासाठी वार्षिक रु. ८ हजार, ११ वी ते १२ वी विद्यालयीन शिक्षणसाठी वार्षिक रु ९,६०० तर १३ वी ते १५ वी पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी वार्षिक रु. १२ हजार इतके अनुदान देण्यात येणार असून याबाबतचा निर्णय नुकताच झाला आहे, याबाबतची सविस्तर आपल्यापर्यंत पोहचविली जाईल असेही आयुक्तांनी नमूद केले. झोपडपट्टी विभागामध्ये असलेली घरे लहान असल्यामुळे मुलांना अभ्यासासाठी अनुकूल वातावरण मिळेल याची शाश्वती नाही त्यामुळे विभागवार झोपडपट्टी विभागात अभ्यासिका उपलब्ध करावयात अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली. यावर ठाणे महापालिकेच्या शाळांमध्ये त्यांना अभ्यासासाठी वर्ग उपलब्ध करुन दिले जातील.**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४





## सेवा संस्थेंतर्गत कायद्याविषयी कार्यशाळेला शहापूर व मुरबाड येथील गाव पातळीवरील प्रशासकीय यंत्रणेचा मोठ्या प्रमाणात सहभाग...

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात शहापूर येथे २९ जानेवारी २०२४ रोजी व मुरबाड येथे ३० जानेवारी २०२४ रोजी पंचायत समिती सभागृह येथे अनुक्रमे एक दिवसीय कायदेविषयक कार्यशाळेचे आयोजन सेवा संस्था ठाणे अंतर्गत करण्यात आले होते.

गावागावांमध्ये बालकांसोबत घडणारे गुन्हे, त्यांचे होणारे शोषण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जनजागृती करणे तसेच बालकांसंदर्भात असलेले मुख्य कायदे म्हणजे २०१५, २०१२, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ तसेच मानवी तस्करी विषय असलेल्या कायद्यांविषयी सखोल मार्गदर्शन करणे, गावपातळीवर काम करताना गावागावांमध्ये बालकांसंदर्भात घडणारे गुन्हे कमी करणे तसेच असे गुन्हे घडू नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी गावपातळी वरील शासकीय यंत्रणा आणखी सक्षमपणे काम करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यशाळेस प्रशिक्षणार्थी म्हणून शहापूर व मुरबाड मधील ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षक, अंगणवाडी सेविका, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. या कार्यशाळेला सेवा संस्थेचे प्रोग्राम मॅनेजर रामेश्वर भाले, प्रकल्प समन्वयक वैभव गायकवाड व ॲड. संजीवनी जाधव यांनी मार्गदर्शन केले. तसेच यावेळी जीवनदिप महाविद्यालय गोवेली, येथील विद्यार्थ्यांनी बालविवाह या विषयाला घेऊन पथनाट्य देखील वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केले होते .

या कार्यशाळेचे आयोजन हे सेवा संस्थेचे शहापूर व मुरबाड तालुक्यातील कर्मचारी समुदायक सामजिक कार्यकर्त्यांनी केले होते.

## ठाणे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शहर कार्यालयात जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीची बैठक संपन्न

**ठाणे :** अंमली पदार्थाच्या सेवनामुळे मानवी शरीरावर व मनावर गंभीर परिणाम होत असतात. परिणामत: समाजावर देखील त्याचे गंभीर दुष्परिणाम दिसून येत असतात. यामुळे महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीची स्थापना केलेली आहे. या समितीची बैठक नुकतीच पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर येथे ठाणे शहर अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ. पंजाबराव उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

आतापर्यंत एकूण ५०६ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सेवनार्थीच्या ४८३ केसेस दाखल करण्यात आल्या असून अशा प्रकारे एकूण ३६ लाख ६५ हजार रुपये किंमत असलेले विविध अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून यात आतापर्यंत एकूण दाखल झालेल्या ४८३ गुन्ह्यांमध्ये एकूण ५०६ आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती या बैठकीत देण्यात आली.

या बैठकीस ठाणे शहर पोलीस उपायुक्त (गुन्हे) श्री. शिवराज पाटील, सहायक पोलीस आयुक्त इंद्रजित कार्ले, अन्न व औषध विभाग, ठाणे औषध निरीक्षक श्री. रा.दि.शिंदे, जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे डॉ. विक्रम काकडे, जिल्हा कृषी विभाग, ठाणे डॉ. अर्चना नागरगोजे, जिल्हाधिकारी कार्यालय, मंडळ अधिकारी श्री. शशिकांत जगताप हे सदस्य तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय रामचंद्र शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक भारत कामत अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा, ठाणे हे उपस्थित होते.

या बैठकीत अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. उगले यांनी बंद रासायनिक कंपन्यांबाबत तपासणी करणे, मेडिकल स्टोर्समध्ये डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शनशिवाय कफ सिरपची तसेच गुंगीकारक औषधांची विक्री होत असल्यास कारवाई करावी, एनडीपीएस संदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात ज्या ठिकाणी गांजा व खसखस यांची लागवड होत असल्यास जिल्हा कृषी अधिकारी यांनी स्थानिक पोलीस किंवा अमली पदार्थ विरोधी पथकाशी समन्वय साधून कारवाई करावी, पोस्ट अधिकारी व खाजगी कुरियर कंपनी यांनी संशयित पार्सल किंवा कुरियर आढळून आल्यास स्थानिक पोलीस किंवा अंमली पदार्थ विरोधी पथकाशी समन्वय साधून कारवाई करण्याबाबत, लोकांमध्ये अंमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्याचे व सर्व संबंधितांनी अहवाल सादर करावा, अशा सूचना दिल्या. १ जानेवारी २०२४ ते २३ जानेवारी २०२४ पर्यंत गांजाबाबतच्या ५ केसेस दाखल झाल्या असून १ लक्ष ३८ हजार रुपये किंमतीचा ६ किलो ५२९ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे, आतापर्यंत यासोबत एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मोफेड्रॉनबाबतच्या २ केसेस दाखल झाले असून ५ लक्ष ८० हजार रुपये किंमतीचा १३६ ग्रॅम मेफेड्रॉन जप्त करण्यात आला आहे. आतापर्यंत यासोबत एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी
आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

## दिवा-शीळमध्ये कुलरला आग

**ठाणे:** दिवा-शीळ, कल्याण फाटा परिसरातील अभय नगर येथील एवरेज अपार्टमेंट या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील रूम क्रमांक - ४०४ मधील कुलरला आग लागल्याची घटना रविवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास समोर आली.जवळपास पाऊण तासांनी आगीवर नियंत्रणात आणण्यात यश आले. ज्यावेळी ही आग लागली त्यावेळी त्या घरात तीन मुलांसह नवरा- बायको असे पाच जण होते. त्यांनी आग लागताच सुरक्षेतेच्या कारणास्तव सुरक्षित रूमच्या बाहेर धाव घेतली. जीवित हानी झाली नसली तरी वित्त हानी मात्र झाली.

# दिव्यातील शिवसेना शाखाप्रमुख चंद्रसेन यादव यांचा वाढदिवस उत्साहात संपन्न



**ठाणे:-** दिवा शहरातील शिवसेनेचे युवा शाखाप्रमुख चंद्रसेन यादव यांचा वाढदिवस उत्साहात साजरा झाला.यावेळी दिव्यातील लोकप्रिय माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी चंद्रसेन यादव यांना प्रत्यक्ष भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी चंद्रसेन यादव यांनी ४५० ते ५०० नागरिकांना अन्नदान आले. चंद्रसेन यादव हे व्यावसायिक असून शिवसेना दिवा उपशहर प्रमुख आणि मा. नगरसेवक शैलेश पाटील यांचे कट्टर समर्थक आहेत. चंद्रसेन यादव मनमिळाऊ स्वभावाचे असून ते सर्वांच्या मदतीला धावून जात असतात. दिवा शहराच्या साबेगावातील डी. जे. कॉम्प्लेक्स येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात शेकडो मित्र मंडळी, नातेवाईक व समर्थक यांनी प्रत्यक्ष भेटून, दुरध्वनी व्दारे ,समाज माध्यमातून चंद्रसेन यादव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. चंद्रसेन यादव परिसरात अनेक सामाजिक कामे करत असतात. माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्यासोबत उभे राहून जोमाने पक्षासाठी काम करत असतात.









## कोमसाप ठाणे ‘मालगुंडसाठी साहित्य पाठवावे

**ठाणे :** २७ फेब्रुवारी, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘मालगुंड ही कोकण मराठी साहित्य परिषद, ठाणे शहराची गृहपत्रिका प्रकाशित होत आहे. या अंकासाठी ‘माणूस आणि मातृभाषा या विषयावरील लेख (शब्द मर्यादा ५००) अथवा कविता पाठवाव्यात. आपले साहित्य मोबाईल क्र. ८१० ८४३ ९९९९ अथवा २०२४. या इमेलवर दि. ७ फेब्रुवारी २०२४ पर्यंत टाइप करून पाठवावे, असे आवाहन अतिथी संपादक मोरेश्वर बागडे यांनी केले आहे.

